मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 21 जुलै 2024 | पान- 1

# मालमत्ता विवरण 'क्यूआर कोड'द्वारे

## सर्वेक्षण अन् करआकारणी पद्धती जाहीर : नोटीस मेल, एसएमएसद्वारे दिली जाणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील नवीन, वाढीव आणि वापरात बदल झालेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण अत्याधुनिक ड्रोनच्या माध्यमातून महापालिकेने सुरू केले आहे. यामुळे मालमत्तांची अचूक माहिती आणि करयोग्य मूल्य निश्चित केले जाणार आहे. त्याची नोटीस ई-मेल, एसएमएस किंवा व्हॉट्सअॅपद्वारे दिली जाणार आहे.

त्यावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर मालमत्ता धारकांना मालमत्तेचा नकाशा, विवरण, मूल्यांकन, देय बिलाची रक्कम असा तपशील दिसेल, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

महापालिका कर आकारणी व कर संकलन विभागाकडून इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी आणि वसुली केली जात आहे. त्यानुसार कर कक्षेत नसलेल्या मालमत्तांना कर कक्षेत आणण्यासाठी स्थापत्य कन्सल्टंट कंपनीमार्फत ड्रोनच्या साहाय्याने सर्वेक्षण सुरू केले आहे. यात नवीन, वाढीव, वापरात बदल अशा मालमत्तांचा शोध घेतला जात आहे.




### मालमत्ता करआकारणी पद्धती

- मालमत्तेची मोजमापे चौरस मीटर पद्धतीने होत आहे
- कर आकारणीसाठी मालमत्तेचा बांधकाम दर्जा, वापर, क्षेत्रफळ विचारात घेतला जात आहे
- मालमत्ता अधिकृत किंवा अनधिकृत आहे, याचीही माहिती घेतली जात आहे
- सामान्य कर सवलतीच्या माहितीचे संकलन, मालमत्तांची विवरणपत्रात माहिती भरून घेण्यात येत आहे
- विवरण पत्रावर मालमत्तेचे मालक, भोगवटादार, प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली जात आहे, स्वाक्षरीस नकार दिल्यास, नमूद केले जात आहे

### करआकारणी हरकतींवर सुनावणी

» विशेष नोटीसवरील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर मालमत्ताधारकास मालमत्तेचे विवरण दिसेल. यानंतर मालमत्ता मालक, भोगवटादारांना लेखी व ऑनलाइन हरकत घेता येईल. त्यासाठी मोबाईलवर ओटीपी बेस सुविधा उपलब्ध आहे. त्याची माहिती मालमत्ता कर सॉफ्टवेअरमध्ये संकलित केली जाईल.करविवरण पाहून आकारणी योग्य किंवा अयोग्य कराबाबतची खातरजमा करता येईल. हरकत दाखल झाल्यानंतर बाजू मांडण्यासाठी सुनावणी होईल. त्यासाठी प्रशासन अधिकाऱ्यांसह सहाय्यक मंडलाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. सुनावणीनंतर आवश्यकतेनुसार स्थळ पाहणी करून करयोग्य मूल्य निश्चित केले जाईल.

> नव्याने आढळणाऱ्या मालमत्तांसाठी कर आकारणीची कार्यपद्धती जाहीर केली आहे. यामध्ये गेल्या सहा वर्षापासून मालमत्ताधारकांना कराची आकारणी केली जाणार आहे. मात्र, मालमत्ता कधी उभारली, याची योग्य कागदपत्रे सादर केल्यास तेव्हापासूनच कराची आकारणी केली जाणार आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

---

# शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणूकांमुळे निवड प्रक्रियेत आणि समितीच्या कार्यकाळात येणार सुसूत्रता...

## आतापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 60 शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुका संपन्न झाल्या आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सर्व महापालिका शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुका घेण्यात येत आहेत. या निवडणूकांची प्रक्रिया १५ जून २०२४ रोजी सुरू झाली असून ३१ जुलै पर्यंत चालणार आहे. या समितीच्या कार्यकाळात आणि निवड प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी ही निवडणूक घेण्यात येत आहे. तसेच आतापर्यंत ६० महापालिका शाळांमध्ये निवडणूका संपन्न झाल्या आहेत.

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम – २००९ नुसार प्रत्येक शाळेने शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये ७५% टक्के पालकांचा तर उर्वरित २५% मुख्याध्यापक, महापालिका सदस्य, शिक्षक आणि शिक्षण किंवा बाल विकास तज्ञ यांचा समावेश असेल. याव्यतिरिक्त, समिती सदस्यांपैकी किमान ५०% महिला असणे आवश्यक असून समितीचे अध्यक्ष पालकांमधूनच निवडले जाणार आहेत.



> महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात पालकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची निर्मिती हे एक महत्वाचे पाऊल आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव मिळेल असे सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणे हे महापालिकेचे ध्येय आहे. प्रथमच या निवडणूका औपचारिकपणे आणि सुयोग्य कार्यप्रणालीद्वारेआयोजित केल्या जात आहेत.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> मिळणारशाळांमध्ये पारदर्शकता आणि सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे आणि यासाठी विविध महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहेत. शाळा व्यवस्थापन समिती निवडणुकांमुळे शाळा व्यवस्थापनात एक संरचित आणि एकसंध दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत मिळेल ज्यामुळे शिक्षणाची एकूण गुणवत्ता वाढेल.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# महापालिकेच्या हद्दीत आरोग्य सेवेचा विस्तार

## पुणे शहर आणि समाविष्ट गावांमध्ये महापालिकेकडून 125 आरोग्यवर्धिनी दवाखाने आणि 58 आपला दवाखाना सुरु केले जाणार आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या योजनेतून महापालिकेच्या हद्दीत आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात येणार आहे. त्यानुसार पुणे शहर आणि समाविष्ट गावांमध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेकडून १२५ आरोग्यवर्धिनी दवाखाने आणि ५८ आपला दवाखाना सुरू केले जाणार आहेत. महापालिकेच्या हद्दीत २५ ठिकाणी आरोग्यवर्धिनी दवाखान्यांची सेवा सुरु झाली आहे. तर ६० ठिकाणी १५ ऑगस्ट पर्यंत सुरु केले जाणार आहेत. तर उरलेल्या ठिकाणी ही सेवा सुरु होण्यासाठी दिवाळीची वाट नागरिकांना पाहावी लागणार आहे.

केंद्र सरकारच्या योजनेतून शहरात सुमारे १२५ आरोग्यवर्धिनी दवाखाने सुरू होणार आहेत. तसेच राज्य सरकारच्या माध्यमातून ५८ आपला दवाखाना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही सेवा या सेवा प्रत्यक्षात २६ जानेवारीपर्यंत नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले होते. आरोग्यवर्धिनी दवाखाने आणि आपला दवाखाना उभारण्यासाठी महापालिकेकडून जागा शोधण्यात येत होती. मात्र खासगी ठिकाणी आकारण्यात येणारे भाडे परवडणारे नव्हते. महापालिका प्रशासनाने पहिल्या टप्प्यात ९६ आरोग्य केंद्रे सुरू करण्यासाठी जागेचा शोध सुरू केला होता. त्यानुसार २९ आरोग्य दवाखान्यासाठी महापालिकेला जागा देखील मिळाली होती. तर उर्वरित दवाखान्यांसाठी जागेच शोध घेतला जात होता. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शर्तीचे प्रयत्न केले जात होते. मात्र आता महापालिकेच्याच जागेत ही सेवा सुरु करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून १२१ ठिकाणी जागा निश्चित केल्या आहेत. तर राहिलेल्या ४ जागा देखली लवकरच निश्चित केल्या जाणार आहेत. त्यामुळे विधान सभा निवडणूकीपूर्वी दवाखान्यांची सेवा सुरु करण्याचा प्रयत्न महापालिकेचा आहे.

सरकारच्या आदेशानुसार २६ जानेवारीपर्यंत सर्व आरोग्यवर्धिनी दवाखाने व आपला दवाखाने सरु करावे लागणार होते. त्यानुसार योग्य नियोजन केल्याचा दावा प्रशासनाने केला होता. परंतु महापालिकेच्या आरोग्य विभागात सातत्याने घडामोडी सुरु असल्याने दवाखान्यांच्या जागांचे नियोजन कोलमडले होते.



### फायबर कंटेनरचा दवाखान्यासाठी वापर

» आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू करण्यासाठी महापालिकेला जागा मिळण्यासाठी कसरत करावी लागत आहे. शहरात अनेक ठिकाणी महापालिकेच्या प्रशासकीय इमारती नाहीत. तसेच केंद्र शासनाच्या या योजनेंतर्गत या दवाखान्यांच्या दुरुस्ती व इतर सुविधांसाठी निधी दिला जाणार आहे. या कारणास्तव महापालिकेला कोणतीही जागा भाड्याने घेता येत नाही. त्यामुळे ज्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी फायबर कंटेनरचा वापर करुन आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. शहरात फायबर कंटेनरमध्ये असे एकूण ४० दवाखाने सुरू करण्यात येणार आहे.

### नवीन केंद्रांसाठी कंत्राटी भरती...

» केद्र सरकारच्या आदेशानुसार दवाखाने सुरु करावे लागणार आहेत. या दवाखान्याच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य सुविधा देण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची गरज भासणार आहे. आता असणारे मनुष्यबळ आपुरे पडत असल्याने या दवाखान्यांसाठी कर्माचाऱ्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे कंत्राटी पध्दीतीने भरती केली जाणार आहे. त्याची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

### 26 जानेवारीपर्यंत दवाखाने सरु

» आरोग्य दवाखान्यासाठी महापालिकेला जागा मिळाली आहे. तर उर्वरित दवाखान्यांसाठी जागेच शोध सुरु आहे. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शर्तीचे प्रयत्न सुरु आहेत. मात्र सरकारच्या आदेशानुसार २६ जानेवारीपर्यंत सर्व आरोग्यवर्धिनी दवाखाने व आपला दवाखाने सरु करावे लागणार आहेत. त्यानुसार योग्य नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे २६ जानेवारी पर्यंत या सेवा सुरु होतील, असा विश्वास महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांनी व्यक्त केला आहे.

# कोंडीमुक्त पुणे शहरासाठी विविध योजना राबवल्या जाणार वाहतूक पोलिसांचा नवा फंडा!

## पुणे पोलीस आयुक्तांनी थेट रस्त्यावर उतरून वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचे आदेश, विविध योजना राबवल्या जाणार आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील रस्त्यांचे उपयोगानुसार वर्गीकरण करण्यात येणार आहे. त्यावर रस्त्याबाबत काम करणाऱ्या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे. त्यानुसार जास्तीत जास्तीत वाहतूक असणारे शहरातील रस्त्यांमध्ये लक्षणीय बदल करण्यात येणार आहेत.

पुणे शहरातील नागरिकांचे वाहतूक कोंडीतून पुणेकरांची लवकरच सुटका होणार आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीं कमी करणे आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी शहरातील वाहतूक प्रमुख ३२ रस्त्यांवर साधरणा करण्यात येणार आहे. या रस्त्यांवर चौक सुधारणा, पार्किंग मॅनेजमेंट, वाहतूक नियंत्रण साधने, वाहतूक विलगीकरण टेक्नीक्स इत्यादी माध्यमातून अभिनव योजना राबवण्यात येणार आहे. यासाठी गुगलबरोबर करार करण्यात येणार आहेत. वाहतूक शाखा व पुणे महानगरपालिका यांच्या समन्वयातून एक ॲप्लीकेशन तयार करण्यात येणार आहे. यामुळे पुणे शहरातील रस्त्यांची कॅरींग कॅपेसिटी (जास्त वाहने जाण्याची क्षमता) वाढवण्यात येणार आहे.



### रस्त्यांची वहन क्षमता वाढेल

» शहरातील मुख्य रस्त्यांना प्राधान्यक्रम देऊन वाहतुकीचा वेग वाढल्यास या रस्त्यांची वहन क्षमता वाढेल. वाहनचालकांचा मुख्य रस्त्यांवरून जाण्याचा कल वाढल्यास अंतर्गत रस्ते, व्यापारी रस्त्यांवरील ताण कमी होईल. मुख्य रस्त्यावरून वाहनांना समान सरासरी वेगाने जाता आले तर त्या रस्त्याची वहन क्षमता वाढते. जर सरासरी वेगापेक्षा कमी किंवा जास्त वेगाने वाहने गेली तर रस्त्यावर जाणाऱ्या वाहनांची संख्या घटते, असे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे.

### काय आहेत उपाय?

» मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा वेग वाढवण्यासाठी रस्त्यावरील चौकात सुधारणा, अद्ययावत सिग्नल यंत्रणा, पार्किंग मॅनेजमेंट, स्पीड ब्रेकर्स, रस्त्याची सरफेसिंग, रस्त्यावरील अतिक्रमणे काढणे, रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची साधणे बसवणे, रस्त्यामधील मिसिंग लिंक्स पूर्ण करणे, रस्त्यावरील वॉटर लॉगिंग पॉईटस दुरुस्त करणे, रस्त्यांवर नो हॉकर्स झोन करणे, रस्त्याबाबतच्या प्रलंबित कोर्ट केसचा पाठपुरावा करणे, रस्त्यांवरील अडथळा आणणाऱ्या झाडांबाबत उचित उपाययोजना करणे, अडथळा करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करणे तसेच या रस्त्यांवर वाहतूक विलगीकरण तंत्राचा वापर करणे आदी उपायांचा वापर केला जाणार आहे. ही कामे वाहतूक पोलीस आणि पुणे महापालिकेकडून केली जाणार आहेत.

# ‘पीएमआरडीए’ साडेसहा हजार सदनिका उभारणार

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (पीएमआरडीए) सेक्टर 12 (मोशी प्राधिकरण, भोसरी एमआयडीसी) येथे गृहप्रकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वसामान्यांना वाजवी दरात घरे मिळण्यासाठी काम करणाऱ्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (पीएमआरडीए) सेक्टर १२ (मोशी प्राधिकरण, भोसरी एमआयडीसी) येथे गृहप्रकल्प राबविण्यात आहे. यातील पहिल्या टप्प्यातील गृहप्रकल्प १ व २ मध्ये ४८८३ सदनिका उपलब्ध झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर असून यात ६४५२ सदनिका उभारण्यात येत आहेत. त्यामुळे शहरवासीयांना परवडणारी घरे मिळणार आहेत. त्याचे जवळपास २५ टक्के काम पूर्ण झाले असून, ४७ इमारतींपैकी २२ इमारतींचे पहिल्या माळ्याचे काम पूर्ण झालेले आहे.

सेक्टर १२ मधील पहिल्या टप्प्यातील प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये ४ हजार ८८३ सदनिका उभारण्यात आल्या होत्या. प्रशस्त इमारत आणि सर्व सुविधांयुक्त सदनिका उभारल्या आहेत. पहिल्या टप्प्याचा मोठा प्रतिसाद लक्षात घेता, दुसऱ्या टप्प्यातील कामकाजाची गती वाढवली आहे. सर्व परवानगी आणि कागदपत्रांची पूर्तता करून हा प्रकल्प सुरू असल्याचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने सांगितले.




दरम्यान, गृहप्रकल्प ३, ४, ५ या प्रकल्पाखालील ११.६३ हे.आर. क्षेत्र असणार आहे. या प्रकल्पात एकूण सदनिका ६ हजार ४५२ उभारण्यात येतील. त्यापैकी ईडब्ल्यूएस ए-टाइप (१ बीएचके) ३ हजार ३२०, ईडब्ल्यूएस बी-टाइप (१ आरके) ३३२, एलआयजी ए (२ बीएचके) १ हजार ४५६, एलआयजी बी (२ बीएचके) १ हजार ३४४ आणि ८३ व्यावसायिक दुकाने उभारण्यात येणार आहेत. वन बीएचके जास्त मागणी लक्षात घेता येथे सर्वाधिक फ्लॅट हे वन बीएचकेचे असणार आहेत.

### प्रकल्पाची सद्यस्थिती

- २२ इमारतींच्या पहिल्या मजल्याची उभारणी
- ११ इमारतींच्या पायाचे काम पूर्ण
- पाच इमारतींच्या खोदाईचे काम पूर्ण
- आठ इमारतींच्या खोदाइचे काम प्रगतीवर
- एका इमारतीचे काम सुरू होणे बाकी

### असा आहे प्रकल्प

इमारती - ४७ (पार्किंग + १४ मजली) (प्रीकास्ट तंत्रज्ञान) आहे. एकूण निविदा रक्कम ७३० कोटी रुपये आहे. इमारती संबंधित महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ (एमपीसीबी) कडील प्राप्त कन्सेंट टू एस्टाब्लिश ऑर्डर - २१ जून २०२३ ची आहे. प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) मान्यतेसाठी नोडल अधिकारी, म्हाडा यांच्याकडे सादर केला आहे. निविदा प्रक्रिया करून कंत्राटदारास १० जुलै २०२३ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

### पहिल्या टप्प्यातील 594 सदनिका, 18 दुकाने शिल्लक

सेक्टर १२ मधील पहिल्या टप्प्यातील ५९४ सदनिका शिल्लक आहेत. १८ दुकानांची विक्रीही बाकी आहे. याचीही सोडत लवकरच काढण्यात येणार असून, त्याची कार्यवाही सुरू आहे. जून अखेरपर्यंत ३ हजार ८७९ घरांचा ताबा देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे १२५ दुकानांपैकी ६५ दुकानांचा ताबाही दिला आहे.

# ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मिती

## शहरातील हॉटेल, खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानांतील कचरा विशेष वाहनांद्वारे करणार संकलित

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून सीएनजी गॅस निर्मिती करणारा प्रकल्प महापालिकेने मोशी येथे उभारला आहे. त्यासाठी हॉटेल, मंगल कार्यालय, रेस्टॉरंटधारकांनी १०० टक्के ओला कचरा विलगीकरण करून महापालिकेच्या ओला कचरा संकलित करणाऱ्या विशेष वाहनातच टाकावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील आयुक्त यांच्या दालनात हॉटेल व्यावसायिक संघटनांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल, अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे यांच्यासह विविध हॉटेल संघटनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने मोशी येथे कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती करणारा प्रकल्प उभारण्यात आला आहे. याच ठिकाणी हॉटेल वेस्टमधील ओल्या कचऱ्यापासून सीएनजी वायू निर्मितीचा प्रकल्प साकारण्यात आला आहे. यासाठी शहरातील हॉटेल, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, खानावळ, कॅन्टीन, खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने अशा ठिकाणी निर्माण होणारा ओला कचरा महापालिकेच्या विशेष वाहनाद्वारे संकलित करण्यात येत आहे.

संकलित करण्यात आलेल्या ओल्या कचऱ्यावर मोशी येथील कचरा डेपो येथे प्रक्रिया करून सीएनजी तयार करण्यात येत आहे. त्यासाठी १०० टक्के ओला कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे, जेणेकरून शुद्ध सीएनजी तयार करण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील हॉटेल्स, मंगल कार्यालये, रेस्टॉरंट, खानावळ, कॅन्टीन, खाद्यपदार्थ विक्रीधारकांनी आपल्या व्यवसायात निर्माण होणारा ओला कचरा १०० टक्के विलगीकरण करून विशेष वाहनातच टाकावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे.

### 50 टन हॉटेल वेस्टवर प्रक्रिया करून 2 हजार किलो

ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्माण करण्याचे काम 'अन्वी डीएम ग्रीन एनर्जी' या खासगी संस्थेला देण्यात आलेले आहे. हा प्रकल्प या संस्थेतर्फे संचालित करण्यात येत आहे. महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयांच्या परिसरात ओला कचरा संकलित करणारे विशेष वाहन पाठवण्यात येत आहे. टप्प्याटप्प्याने हॉटेल वेस्ट वाढवून दररोज ५० टन हॉटेल वेस्टवर प्रक्रिया करून २ हजार किलो सीएनजी तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. शिल्लक राहिलेल्या लगद्यापासून लिक्विड फर्टिलायझर तयार केले जाईल. शहराचे झपाट्याने होणारे विस्तारीकरण, वाढणारी लोकसंख्या आणि मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा कचरा याचे व्यवस्थापन करण्यासाठी तसेच दुर्गंधी, रोगराईपासून शहरवासियांची कायमची सुटका करण्यासाठी या प्रकल्पाची क्षमता वाढवणार असल्याचे महापालिकेचे कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल यांनी सांगितले.

# ‘लाडक्या भावा’साठी महापालिकेची लगबग

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या निमित्ताने महापालिकेकडून करवून घेतले जाणार महायुतीच्या प्रचाराचे काम

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे सरकारने ‘लाडकी बहीण’ या योजनेनंतर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण ही नवी योजना सुरू केली आहे. ही योजना ‘लाडका भाऊ’ या नावाने ओळखली जात आहे. या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्यातील महापालिकांना राज्य सरकारने कामे लावली आहेत. शहरातील कंपन्यांसोबत तसेच कंत्राटी कंपन्यांसोबत घेऊन तरुणांना अ‍ॅप्रेंटिसशिप मिळवून देण्यासाठी काम महापालिकेला काम करावे लागणार आहे. यामुळे एक प्रकारे महापालिकेकडून महायुतीच्या प्रचाराचे काम करून घेतले जाणार आहे.

राज्य सरकारच्या ‘लाडकी बहीण’ योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. बहिणीसाठी योजना आणली पण बेरोजगार भावासाठी सरकारने काहीही केले नसल्याचा आरोप विरोधकांकडून



केला जाऊ लागला. त्यानंतर भावालाही अंतर देणार नाही, असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडका भाऊ ही योजना लागू केली आहे.

या योजनेमध्ये तरुणांना दरमहा तब्बल १० हजार रुपये दिले जाणार आहेत. तरुणांना बेरोजगारीतून मुक्त करण्यासाठी ही आर्थिक मदत दिली जाणार आहे. महापालिका हद्दीतील कंपन्यांना एकत्रित करून भावासाठी अ‍ॅप्रेंटिसशिप मिळवून देण्याचे काम करावे लागणार आहे. अ‍ॅप्रेंटिसशिप मिळाल्यानंतरच भावाला या योजनेचा फायदा मिळणार आहे. त्यासाठी आता महापालिकेकडून कंपन्यांच्या संघटनांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधला जाणार आहे. त्यानंतर नियोजन केले जाणार आहे. त्यासाठी आता प्रशासनाला काम करावे लागणार असून १५ ते २० हजार भावांना अ‍ॅप्रेंटिसशिप मिळवून देण्याचे तोंडी टार्गेट देण्यात आल्याचे

### अशी करा ऑनलाइन नोंदणी

» लाडका भाऊ योजनेसाठी महाराष्ट्राच्या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करता येते.
» वेबसाइटचे होम पेज ओपनवर नवीन नोंदणी या पर्यायावर क्लिक करावे लागेल
» अर्जामध्ये विचारलेली सर्व आवश्यक माहिती काळजीपूर्वक भरावी
» आवश्यक कागदपत्रे या अर्जासोबत जोडावी लागतील

महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. सोमवारी (दि. २२) याबाबत महापालिकेत बैठक घेतली जाणार असून पुढील कार्यवाही केली जाणार आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यापूर्वी महाराष्ट्र सरकारने एकापाठोपाठ एक योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे लाडकी बहीण या योजनेनंतर लाडका भाऊ योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी सराकारकडून प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी राज्यातील सरकारी विभागांची मदत घेतली जात आहे. यासाठी महाराष्ट्र सरकार ६ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. तरुणांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार आणि आर्थिक मदतही दिली जाणार आहे. याशिवाय प्रशिक्षणादरम्यान पुढील अभ्यासासाठी आर्थिक साहाय्यही देण्यात येणार आहे, जेणेकरून युवक व विद्यार्थ्यांना रोजगार मिळून त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करता येईल. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि राज्यातील बेरोजगारीचे प्रमाणही कमी होईल.

# मायक्रोसॉफ्टच्या बिघाडामुळे विमाने जमिनीवरच!

## मायक्रोसॉफ्ट ठप्प झाल्याने विमान कंपन्यांची ऑनलाइन यंत्रणा बंद पडली

**पुणे | प्रतिनिधी**

मायक्रोसॉफ्टच्या क्लाउड सेवेतील तांत्रिक बिघाडाचा फटका पुणे विमानतळावरील विमानसेवेला शुक्रवारी बसला. विमान कंपन्यांची ऑनलाइन यंत्रणा बंद पडल्याने कर्मचाऱ्यांना हाताने लिहून बोर्डिंग पास प्रवाशांना द्यावे लागले. या प्रक्रियेला खूप विलंब लागत असल्याने शुक्रवार आणि शनिवारची ४० विमाने रद्द करण्यात आली आहेत. याचबरोबर अनेक विमानांना विलंब होत आहे.

मायक्रोसॉफ्ट ठप्प झाल्याने विमान कंपन्यांची ऑनलाइन यंत्रणा बंद पडली. यामुळे विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांना बोर्डिंग पास देण्यास विलंब होत होता. प्रवाशांना हाताने लिहून बोर्डिंग पास देण्याची वेळ विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांवर आली होती.




पुणे विमानतळावरून उड्डाण करणारी २१ विमाने आणि येणारी १९ विमाने अशी ४० विमाने रद्द करण्यात आले. याचबरोबर अनेक विमानांना विलंब होत आहे. विमाने रद्द झाल्याने प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. विमानतळावर प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने गोंधळाचे वातावरण आहे.

विमान कंपन्यांकडून प्रवाशांना विमान रद्द झाल्याची माहिती कळविण्यात येत आहे. विमानतळावर प्रवाशांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्याचे प्रयत्न भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून सुरू आहेत. याचबरोबर प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठीही पावले उचलली जात आहेत. विमानतळावर

### समस्या सोडविण्यासाठी पावले

» याबाबत केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, की मायक्रोसॉफ्टच्या क्लाउड सेवेतील बिघाडामुळे जगभरात अनेक क्षेत्रांना फटका बसला. त्यात भारतातील विमान कंपन्यांच्या ऑनलाइन यंत्रणेचाही समावेश आहे. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय आणि नागरी हवाई वाहतूक मंत्रालय परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. तांत्रिक बिघाडाबद्दल प्रवाशांना वेळीच सूचना द्याव्यात, असे निर्देश विमान कंपन्यांना दिले आहेत. प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी आमचे कर्मचारी सातत्याने प्रयत्न करीत आहेत.

अडकून पडलेल्या प्रवाशांच्या खानपानाची व्यवस्थाही केली जात आहे, अशी माहिती विमानतळ प्रशासनाकडून देण्यात आली.

याबाबत पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके म्हणाले, की पुणे विमानतळावरून दिवसा विमानांची संख्या कमी आहे. प्रामुख्याने रात्रीच्या वेळी विमानांची संख्या जास्त आहे. त्यामुळे दिवसभर मोठी समस्या निर्माण झाली नाही. तांत्रिक अडचणीमुळे विमान कंपन्यांचे कर्मचारी प्रवाशांना हाताने लिहून बोर्डिंग पास देत होते. या प्रक्रियेला उशीर होऊन काही विमानांना विलंब झाला. विमान कंपन्यांची ऑनलाइन यंत्रणा सुरू न झाल्याने शुक्रवारी आणि शनिवारी नियोजित विमाने रद्द करण्यात आली आहेत.